माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. अम- १७२/२०२३**

**तक्रारकर्ता, श्री.दि.ना.तांदळे,**
**भांडारनोकर, प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, गृहविभाग,**
**म.शा.अमरावती ४४४६०६**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक न्यायसहायक**
**वैज्ञानिक प्रयोगशाळा कार्यालय अमरावती, गृहविभाग, म.शा.अमरावती ४४४६०६**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,**
**प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, गृहविभाग, म.शा.अमरावती ४४४६०६**

**तक्रार सुनावणी दिनांक - २४.०८.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | **:** | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | **:** | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | **:** | **अनुपस्थित** |

तक्रारकर्ता यांनी दि.१२.०५.२०२३ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०३.२०२३ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेतली नाही, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२४.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी सौ.शर्वरी स.कुळकर्णी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१३.०३.२०१३ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेतली नसल्याने तक्रारकर्त्याने आयोगाकडे थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, तक्रारकर्ता यांचा युक्तीवाद व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या दि.१३.०३.२०२३ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर कुठलीच सुनावणी घेतली नसल्यामुळे दि.१२.०५.२०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या खुलाशानुसार तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हे दि.२८.०२.२०२३ रोजी निवृत्त झाल्यामुळे व वरील पदावर कुठल्याच अधिकाऱ्याची नियुक्ती झाली नसल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणुन कोणालाच नामनिर्देशित करण्यात आले नव्हते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०७.२०२३ पासुन पदभार स्विकारला असुन अपिलार्थी यांचे प्रथम अपिल अर्जावर विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दोन्ही बाजुंना सुनावणीची संधी देवुन समन्यायिक व स्वयंस्पष्ट आदेश पारीत करणे अपेक्षित असुन प्रस्तुत प्रकरणी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, प्रादेशिक न्यायसहायक, वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती यांनी वरील आदेश प्राप्त होताच शक्य तितक्या लवकर कुठल्याही परिस्थितीत ४ आठवडयाच्या आत निर्णय घेण्याचे निर्देशासह तक्रार अर्ज निकाली काढण्यात येते.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २४.०८.२०२३**

जावक क्रमांक ---8043--- दिनांक ---23/11/2023---